# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ०८/२०१२-१३/ दिनांक :

१) श्री. तानाजी महादेव शितोळे,
मु.पो. बेळोंखी, ता. जत, जि. सांगली. — अर्जदार

**विरुध्द**

१) कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,
सं व सु मंडळ कार्यालय, सांगली
२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली
३) सहाय्यक अभियंता,
म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, जत, जि. सांगली — विरुध्द पक्षकार

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. तानाजी महादेव शितोळे, मु.पो. बेळोंखी, ता. जत, जि. सांगली यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी जत उप विभाग विरुध्द तक्रार दि. २.४.२०११ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

तक्रारदार ग्राहकाने आपले घर क्र. ५७६ मध्ये नवीन घरगुती वीज जोडणी मिळावी यासाठी रु. ५०७/- दि. ३१.५.२०१० रोजी पावती क्र. ८०२६०१ नुसार चलन भरले आहे. ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे दि. २७.१.२०१२ रोजी तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाने कुठलेही आदेश दिले नाही म्हणून मंचाकडे तक्रार दाखल केली. मंचाकडून अपेक्षित मदत - वीज जोडणी बाबत ४.५ कृती मानकेमध्ये जी तरतूद आहे त्याची अंमलबजावणी व आदेश व्हावा. अर्जासोबत प्रतिज्ञापत्र, व चलनाची झेरॉक्स प्रत जोडली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. २.५.२०१२ च्या लेखी अहवालात ग्राहकाने नवीन घरगुती वीज जोडणीसाठी दि. ३१.५.२०१० रोजी चलन भरल्याचे मान्य केले आहे. तसेच जत उप विभागांतर्गत ७२५ घरगुती ग्राहकांची लाईन ओढण्यासाठी मे. प्रिकॉशन इलेक्ट्रीकल्स, शिपूर यांना आदेश देण्यात आले आहेत. त्यामध्ये ३२७ कनेक्शनसाठीची लाईन ओढण्यात आलेली आहे व त्या पुढील ग्राहकांचे लाईन ओढण्याचे काम सुरु आहे. सदर ग्राहकाचे नांव कंपनीला दिलेल्या यादीमध्ये असून एक महिन्यात त्यांचे कनेक्शन देण्यात येईल असे म्हटले आहे. या सर्व गोष्टींचा विचार करुन नुकसान भरपाई मान्य करण्यात येवू नये.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. ९.५.२०१२ रोजी सुनावणीस घेतली असतां, तक्रारदार गैरहजर, प्रतिनिधी नेमले नाहीत. वि.प.तर्फे श्री. मैलापुरे, सहाय्यक अभियंता व श्री. ए.एस. भोसले, सहाय्यक अभियंता उपस्थित. त्यांनी ग्राहकास दि. ३१.५.२०१२ पर्यंत वीज जोडणी देणार असे मंचासमोर सांगितले, तथापि आजपर्यंत वीज जोडणी दिली की नाही याचा अहवाल मंचासमोर सादर केला नाही.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे वीज जोडणी व भरपाईचे आदेश देणे योग्य होईल काय ?
उत्तर : होय

## कारणमिमांसा

उभयबाजूंच्या लेखी कथनानुसार ग्राहकाने दि. ३१.५.२०१० रोजी चलन भरल्याचे मान्य आहे. ग्राहकाच्या म्हणण्यानुसार अंतर्गत कक्षाकडे दि. २.२.२०१२ ला गाऱ्हाणे दाखल करुनही कक्षाने कुठलेही आदेश केले नाही. तक्रारदाराने वीज जोडणी बाबत ४.५ कृती मानकेमध्ये जी तरतूद आहे त्याची अंमलबजावणी व आदेश व्हावा अशी मागणी केली आहे. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी लेखी अहवालात घरगुती ग्राहकांची लाईन ओढण्यासाठी मे. प्रिकॉशन इलेक्ट्रीकल्स, शिपूर यांना दिलेल्या वर्क ऑर्डरमध्ये ग्राहकाचे नांव आहे असे नमूद केले आहे, परंतु विलंबाबद्दल मंचासमोर कुठलेही स्पष्टीकरण दिले नाही. उलट लेखी अहवालात व मंचासमोर ग्राहकास एक महिन्यात दि. ३१.५.२०१२ पर्यंत वीज जोडणी देण्यात येईल असे म्हटले असले तरी दि. ४.६.२०१२ पर्यंत ग्राहकास वीज जोडणी दिली की नाही याचा अहवाल सादर केला नाही. गाऱ्हाण्यातील मागणीनुसार वाहिनी विस्तार असल्याने ३ महिन्यात वीज जोडणी देणे आवश्यक होते ही बाब वि.प.ने मंचासमोर स्पष्टपणे नाकारलेली नाही. त्यामुळे कृती मानके विनियम व परिशिष्ट अ मधील तरतुदीनुसार तीन महिन्यानंतरच्या विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/- या प्रमाणे भरपाई मिळण्याचा ग्राहकाचा हक्क आहे व वि.प.ची ती जबाबदारी आहे, कारण कृती मानकाची पूर्तता करण्यात वि.प.अपयशी ठरली आहे. मुद्दा क्र. १ चे उत्तर होय असे देण्यात येत आहे. खालील प्रमाणे आदेश -

This document was created using SmartPDFCreator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

## आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनी जत उप विभाग, कवठे महांकाळ विभाग यांनी तक्रारदार ग्राहकास त्यांचे घर क्र. ५७६ मध्ये नवीन घरगुती वीज जोडणी त्वरित द्यावी व त्याचा अहवाल मंचास सादर करावा.

३) वितरण कंपनी जत उप विभाग, कवठे महांकाळ विभाग यांनी तक्रारदार ग्राहकास दि. १.९.२०१० पासून वीज जोडणी देईपर्यंतच्या कालावधीतील विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/- या प्रमाणे भरपाई द्यावी. सदर रकमेचे समायोजन दोन बिलींग सायकलमध्ये करुन उर्वरित रक्कम ग्राहकास रोखीने द्यावी.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखे-पासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com